# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १४१ वा ❑ भारतीय सौर दिनांक २३ आषाढ शके १९४८, बुधवार दि.१५ जुलै २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

## मुकल्या संवेदना, मेली व्यवस्था: एक क्रूर वास्तव

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

''मुकल्या संवेदना, मेली व्यवस्था: एक क्रूर वास्तव'' हा केवळ एक विचार नसून आजच्या समाजाचे आणि प्रशासकीय यंत्रणेचे विदारक चित्रण करणारा एक अत्यंत संवेदनशील आणि गंभीर विषय आहे.

आज आपण २१ व्या शतकात, विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या सर्वोच्च शिखरावर आहोत. मात्र, भौतिक प्रगती होत असतानाच मानवी मूल्यांचा आणि सामाजिक व्यवस्थेचा वेगाने ऱ्हास होत आहे. ''माणूस'' तंत्रज्ञानाने जोडला गेलाय, पण मनातून कमालीचा दुरावला आहे. संवेदनांचा हा दुष्काळ आणि व्यवस्थेचा ढिसाळपणा आज आपल्यासमोर एक क्रूर वास्तव म्हणून उभा आहे

राजस्थानच्या श्रीगंगानगरमध्ये अवघ्या १३ वर्षांच्या एका चिमुरडीवर ३२ नराधमांनी पाच दिवस आलटून-पालटून केलेला पाशवी सामूहिक अत्याचार ही केवळ एका गुन्ह्याची बातमी नाही; तर ती आपल्या तथाकथित सुसंस्कृत, आधुनिक समाजाच्या छाताडावर बसलेला एक क्रूर आणि विदारक ओरखडा आहे. एका ई-रिक्षाचालकाने अल्पवयीन मुलीचे अपहरण करणे, तिला पैशांसाठी हॉटेलचालकांना विकणे आणि त्यानंतर सलग पाच दिवस वेगवेगळ्या हॉटेल्समध्ये डांबून ठेवून तिच्या बालपणाचे लचके तोडणे, हा मानवी क्रूरतेचा आणि विकृतीचा कळस आहे. या घटनेने देशातील महिला आणि बालकांच्या सुरक्षेच्या दाव्यांचे केवळ धिंडवडे काढलेले नाहीत, तर संपूर्ण देशाच्या विवेकाला सुन्न करून सोडले आहे.

जनक्षोभ अनावर झाल्यानंतर राजस्थान पोलिसांनी तत्परता दाखवत मुख्य आरोपींसह चौदाहून अधिक जणांना बेड्या ठोकल्या आहेत. गुन्ह्यासाठी वापरली गेलेली आणि अवैधपणे चालवली जाणारी हॉटेल्स प्रशासनाने बुलडोझर लावून जमीनदोस्त केली आहेत. प्रशासनाची ही तत्परता आणि तात्कालिक कारवाई लोकांचा रोष शांत करण्यासाठी आणि एक संदेश देण्यासाठी आवश्यक असली, तरी मूळ प्रश्न इमारती पाडण्याचा नाही. प्रश्न अशा गुन्हेगारी प्रवृत्तींना आणि विकृतीला आश्रय देणाऱ्या संपूर्ण सिंडिकेटला मुळापासून उखडून टाकण्याचा आहे. एका चिमुरडीला पाच दिवस शहरात वेगवेगळ्या ठिकाणी फिरवले जाते, हॉटेल्समध्ये डांबले जाते, तिथे अनेक नराधम येत-जातात, तरीही स्थानिक पोलीस आणि गुप्तहेर यंत्रणेला याचा सुगावा लागत नाही, हा प्रशासनाचा ढिसाळपणा आणि पराभव आहे.


हा गुन्हा केवळ वैयक्तिक वासनेपुरता मर्यादित नाही, तर यामागे अत्यंत संघटित आणि क्रूर अशा मानव तस्करीचे जाळे कार्यरत असल्याचे उघड होत आहे. एका गरीब किंवा असहाय्य मुलीला उचलणे, तिला हॉटेल चालकांच्या हवाली करणे आणि त्यातून व्यवसाय चालवणे, हा एक अत्यंत धोकादायक पॅटर्न आहे. अशा प्रकारची अवैध हॉटेल्स, लॉजेस आणि तिथले अनधिकृत व्यवसाय हे केवळ कायद्याचे उल्लंघन करत नाहीत, तर ते अशा भयानक गुन्ह्यांची केंद्र बनत चालले आहेत. पोलिसांनी केवळ या ३२ नराधमांना पकडून थांबता कामा नये, तर या संपूर्ण सेक्स रॅकेट आणि मानवी तस्करीच्या साखळीचे धागेदोरे कुठपर्यंत पोहोचले आहेत, याचा सखोल शोध घेऊन त्यामागच्या पांढरपेशा चेहऱ्यांचाही बुरखा फाडला पाहिजे. सध्या सोशल मीडियापासून ते रस्त्यांपर्यंत ''या नराधमांना थेट जनतेच्या हवाली करा, जाहीर फाशी द्या'' अशी तीव्र मागणी होत आहे. सामान्य जनतेमधून येणारा हा आक्रोश केवळ कायद्याचे उल्लंघन करण्याची मानसिकता दर्शवत नाही, तर तो आपल्या संथ न्यायप्रक्रियेवरील अविश्वास आणि लोकांच्या मनात साठलेल्या प्रचंड संतापामधून आलेला आहे. निर्भया कांडानंतर कायदे कडक झाले, हाथरस किंवा कोलकाता येथील घटनांनंतर देशभर आंदोलने झाली, तरीही जर गुन्हेगारांच्या मनात कायद्याचा आणि शिक्षेचा यत्किंचितही धाक उरलेला नसेल, तर आपल्या न्यायप्रक्रियेच्या गतीवर आणि अंमलबजावणीवर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. जेव्हा कायदे केवळ पुस्तकात राहतात आणि शिक्षेला वर्षानुवर्षे उशीर होतो, तेव्हाच अशा अमानुष प्रवृत्ती निर्धास्तपणे वावरतात. आता या प्रकरणात पोलिसांसमोर आणि न्यायव्यवस्थेसमोर सर्वात मोठे आव्हान हे तांत्रिक आणि कायदेशीर पातळीवर असणार आहे. फास्ट ट्रॅक कोर्ट आणि विशेष वकील: हे प्रकरण केवळ नियमित न्यायालयीन प्रक्रियेत अडकून पडू नये. यासाठी विशेष सरकारी वकिलांची नियुक्ती करून हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवला गेला पाहिजे आणि सहा महिन्यांच्या आत सर्व ३२ नराधमांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे ३२ आरोपींविरुद्धचे फॉरेन्सिक पुरावे, हॉटेलचे सीसीटीव्ही फुटेज, डिजिटल पुरावे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मरणाच्या दारातून परत आलेल्या त्या पीडितेचा जबाब इतका भक्कम असावा की, कोणत्याही तांत्रिक त्रुटीचा फायदा घेऊन एकाही नराधमाला जामीन मिळता कामा नये. शारीरिक आणि मानसिक पातळीवर पूर्णपणे उद्ध्वस्त झालेल्या त्या १३ वर्षांच्या चिमुरडीला सर्वोत्तम वैद्यकीय उपचार देणे, तिचे समुपदेशन करणे आणि तिला सुरक्षित आयुष्य मिळवून देणे ही आता केवळ तिच्या कुटुंबाची नाही, तर सरकार आणि संपूर्ण समाजाची नैतिक जबाबदारी आहे. आपण डिजिटल प्रगती आणि जागतिक महासत्ता होण्याच्या गप्पा मारत असताना, आपल्या देशातील लेकी-सुना सुरक्षित नसतील, तर ती प्रगती पोकळ आहे. या नराधमांना त्यांच्या कृत्याची अशी शिक्षा मिळाली पाहिजे, जी पाहून भविष्यात कोणत्याही नराधमाचा काळजाचा थरकाप उडेल. ही घटना म्हणजे देशाच्या न्यायव्यवस्थेची, कायद्याच्या राज्याची आणि प्रशासकीय इभ्रतीची एक मोठी परीक्षा आहे; यात अपयशी होणे या देशाला आणि समाजाला परवडणारे नाही.

जेव्हा संवेदना आणि व्यवस्था दोन्ही एकाच वेळी मृत पावतात, तेव्हा समाजाचे अतोनात नुकसान होते. निर्भया किंवा कोपर्डीसारख्या घटना घडतात, तेव्हा काही काळ मेणबत्त्या जळतात, मोर्चे निघतात; पण पुन्हा काही दिवसांनी सर्व शांत होते. ही शांतता अधिक भयानक आणि क्रूर आहे. आपण एका अशा समाजात जगत आहोत जिथे कायद्याचा धाक उरलेला नाही आणि माणसाला माणसाची भीती वाटू लागली आहे.

# कालिदास – संस्कृत भाषेचे महान सर्वश्रेष्ठ कवी आणि नाटककार

**ज्योतिर्मय साहित्य**

अस्मानातून घनघोर बरसणाऱ्या कज्जलसम मेघराजाला आता कुणा 'अलनिनो' नामक दुष्टाची नजर न लागो, म्हणून त्याच्यावरून इथूनच, म्हणजे पृथ्वीतलावरून त्याची शब्दरूपी काळ्या मोहऱ्यांनी आणि काळ्या मिठाने दृष्ट काढावी म्हणते! पण माझे हे बाळबोध शब्द त्याला कुठले रुचायला! कारण त्याच्यावर कैक शतके एका खऱ्या अर्थाने विश्वकवी असलेल्या कालिदासांनी आपला जीवचं ओवाळून टाकलाय!







आषाढ मासाच्या प्रथम दिनीं साजऱ्या होणाऱ्या कालिदासदिनाच्या निमित्त्याने हा लेख सादर करीत आहे! कालिदास संस्कृत भाषेचे महान सर्वश्रेष्ठ कवी आणि नाटककार! ''आषाढस्य प्रथम दिवसे''! या मंत्राचे प्रणेते कालिदास यांच्या स्मृतीस अभिवादन करून प्रत्येक वर्षी आपण आषाढ महिन्याच्या प्रथम दिनी (आषाढ शुक्ल प्रतिपदा) कालिदास दिन साजरा करतो. हा आषाढमासाचा प्रथम दिन म्हणजे 'कालिदास दिन' आहे, कालिदास जयंती नव्हे, कारण त्यांच्या प्रत्यक्ष जीवनाविषयी फारच कमी माहिती उपलब्ध आहे. दुसऱ्या-पाचव्या शताब्दीतील गुप्त साम्राज्य काळातील अनुपमेय साहित्यकार म्हणून त्यांना गौरवान्वित केलेले आहे. त्यांच्या काव्यप्रतिभेला अनुसरून त्यांना दिलेली




''कविकुलगुरु'' ही उपाधी स्वतःच अलंकृत आणि धन्य झाली आहे! संस्कृत साहित्याच्या रत्नमालेत त्यांचे साहित्य या मालेच्या मध्यभागी चमकत्या कौस्तुभ मण्याप्रमाणे जाणवते! पाश्चात्य आणि भारतीय, प्राचीन आणि अर्वाचीन विद्वानांच्या मते कालिदास हे जगन्मान्य, सर्वश्रेष्ठ व एकमेवाद्वितीय असे कवी आहेत! या साक्षात सरस्वतीपुत्राच्या बहुमुखी व बहुआयामी प्रज्ञेचे, प्रतिभेचे आणि मेधावी व्यक्तिमत्वाचे म्या पामराने एका मुखाने वर्णन तरी कसे करावे, किंबहुना त्यांच्या चरणी लीन होऊनच मी ही शब्दभावसुमने त्यांना अर्पण करण्याचे धाडस करीत आहे! सूज्ञ वाचकांनी यात कालिदासांच्या प्रती असलेली माझी केवळ आणि केवळ श्रद्धाच ध्यानात असू द्यावी. अन्यथा एक गोगलगाय किंवा शेप किडा हिमालयाला वेढा घालण्याचे स्वप्न तरी बघतील का किंवा एक लहानशी मासोळी पंचसागरांना प्रदक्षिणा घालण्याचे धाडस करील का? मात्र माझे मर्यादित शब्दभांडार, भावविश्व आणि संस्कृत भाषेचे अज्ञान, या सर्व अडसरांना पार करीत मी हा लेख लिहिण्याचे ठरवले.

मैत्रांनो, संस्कृत येत नसल्याने, मी कालिदासांच्या साहित्याचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी अनुवाद (अनुसृष्टी) वाचलेत! त्यानेच मी इतके भारावून गेले की काय सांगू! या मर्यादेच्या अधीन राहूनच कालिदासांच्या महान साहित्याचे मूल्यमापन नव्हे तर एक वाचक म्हणून रसास्वाद घेण्याच्या दृष्टीनेच हा लेख लिहीत आहे!

**(क्रमश)**

# मनस्वी भटकणाऱ्या मेघाशी यक्षाचा काव्यमय संवाद -कालिदासाचे मेघदूत

**ज्योतिर्मय साहित्य**

उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम्।
दण्डिनः पदलालित्यं माघे सन्ति त्रयो गुणाः।।

कालिदास त्यांच्या उपमांकरिता जगात प्रसिद्ध आहे. त्यांच्या उपमा चित्ताकर्षक असतात. कालिदास हे एक अभिजात संस्कृत लेखक होते, त्यांना भारतीय संस्कृत भाषेतील महान कवी आणि नाटककार म्हणून व्यापकपणे ओळखले जाते. त्यांची नाटके आणि कविता प्रामुख्याने वेद, रामायण, महाभारत आणि पुराणांवर आधारित आहेत. कालिदासाच्या सप्त साहित्यात तीन नाटके, दोन खंडकाव्ये आणि आणि दोन महाकाव्यांचा समावेश होतो.

संस्कृत भाषेमधील महान साहित्यकार महाकवी कुलगुरू कालिदास यांचे साहित्य हजारो वर्षापासून सर्वाना प्रेरणादायी ठरले आहे. संस्कृत भाषेमध्ये त्यांनी अतिउच्च दर्जाचे साहित्य भारत वर्षाला दिलेले आहे. आषाढ महिन्याचा पहिला दिवस हा कालिदासाचा जन्मदिवस म्हणून साजरा होतो.


संस्कृत साहित्यामध्ये त्यांचे स्थान अतिउच्च कोटीतले आहे. त्यांच्या ऋतुसंहार, कुमारसंभवम्, रघुवंशम्, मेघदूत या काव्य रचना, तसेच मलाविकाग्नीमित्र, विक्रमोवंशीय, अभिज्ञान शाकुंतलम् या संस्कृतमधील नाटक-वजा-महाकाव्य रचनांमुळे त्यांना संस्कृत विद्वान म्हणून भारतभूमीत मान्यता मिळाली, तसेच ती जगभरात पसरली व अजरामर झाली.

मेघदूत

मेघदूताची पार्श्वभूमी अशी आहे कि, अलका नगरीतील एका यक्षाने आपल्या कामात काही प्रमाद केल्यामुळे कुबेराने एक वर्षभर तुझे सामर्थ्य नष्ट होईल' असा त्याला शाप दिला, तेव्हा त्याला अलका नगरी सोडावी लागली व सीतादेवीने स्नान केल्यामुळे जिथले पाणी पवित्र झाले आहे, अशा रामगिरीवरील आश्रमात तो एकटाच येऊन राहिला. तेथे आठ महिने झाल्यानंतर आषाढ महिन्याच्या आरंभी, वर्षाऋतू जवळ आला असता, मेघदर्शनाने त्याला प्रियाविरह दु:सह झाला. आपल्या पत्नीची ही अशी अवस्था झाली असेल, असे जाणून त्याने त्या मेघाला आपला दूत म्हणून पाठविण्याचे ठरविले. वास्तविक धूम, अग्नी, जल व वायू वगैरेंच्या समवार्याने उत्पन्न झालेला अचेतन मेघ यक्षाचा संदेश कसा नेणार? पण प्रेमाने व्याकुळलेल्या यक्षाला इतका विवेक कोठला! त्याने त्या पर्वतावर उभारलेली पुष्पे मेघाला अर्पण करून व त्याची स्तुती करून अलकेचा मार्ग सांगावयास सुरुवात केली.


**पूर्वमेघ व उत्तरमेघ :**

पूर्वमेघ यामध्ये, एकूण ६५ श्लोक आहेत, तर उत्तरमेघ यामध्ये ५५ श्लोक आहेत. पूर्व मेघामध्ये रामगिरीवर मेघाला साकडे




घालण्यापासून (श्लोक ४) येथून सुरुवात होते व मेघाला अलका नगरीत यक्षाला प्रियतमा दृगोच्चर होते. इथे अर्धविराम होतो.

तस्योत्सङ्गे प्रणयिन इव स्रस्तगङ्गादुकूलां
न त्वं दृष्ट्वा न पुनरलकां ज्ञास्यसे कामचारिन्




।


या वः काले वहति सलिलोद्गारमुच्चैर्विमाना
मुक्ताजालग्रथितमलकं कामिनीवाभ्रवृन्दम्
।।६५।। पूर्वमेघ : कालिदासाच्या कल्पनेचा विलास व भाषा सौंदर्य म्हणून उत्तर मेघातील एक श्लोक इथे उधृत करतो. मेघ यक्षाचा दूत म्हणून अलका नगरीत पोहचतो व याक्षाच्या प्रियेला पाहिल्यावर तिचे वर्णन करतो.

श्यामास्वङ्गं चकितहरिणीप्रेक्षणे दृष्टिपातं
वक्त्रच्छायां शशिनि शिखिनां बर्हभारेषु
केशान्।
उत्पश्यामि प्रतनुषु नदीवीचिषु भ्रूविलासान्

हन्तैकस्मिन्क्वचिदपि न ते चण्डि सादृश्यमस्ति।।४४।।उत्तरमेघ : याचा सरळ मराठीत अनुवाद न करीता ज्येष्ठ कवयित्री स्व. शांताबाई शेळके यांनी केलेला अनुवादच तुमच्याकरिता देतो.

वेलीच्या वलयांत तनू
तव धृतभृंगीमधीं चंचल
डोळे
शशीमध्ये मुख,
मोरपिसारा – केशभार ते
तव आंदोळे
लहरी उठती सरितेवरती
भृभंगच ते रम्य वांकडे
एका ठायी, हाय, परंतु
साम्य नाच तुझे सांपडे !
मंदाक्रांता –
गजगामिनीचा पदन्यास

शब्दांचे, अर्थाचे वा दोन्हींचे सौंदर्य वाढविणारी अनुप्रास, उपमा, उत्प्रेक्षा आदी विशिष्ट शब्दार्थयोजना 'अलंकार' या नावाने ओळखली जाते. रस, गुण वा रीतीसुद्धा सौंदर्यकारक असली तरी त्याहून अलंकार भिन्न होत, असे अनेकांचे मत आहे. चमत्कृतिजनक शब्दार्थयोजना म्हणजे अलंकार, अशीही व्याख्या साहित्यशास्त्रकार करतात. शब्दार्थांच्या सौंदर्याचा प्रश्न मुख्यतः ललित साहित्यकृतींच्या संदर्भात येतो. त्यामुळे अलंकारांची चर्चा साहित्यशास्त्राला अपरिहार्य ठरते. 'अलंकार' या शब्दाचा मुख्यार्थ पाहिला तर दागिना किंवा शोभादायक वस्तू असा आहे. विविध प्रकारच्या दागिन्यांनी शरीर जसे सुशोभित होते, त्याचप्रमाणे निरनिराळ्या अलंकारांनी साहित्य सजविले जाते, अशी कल्पना हा शब्द साहित्याच्या संदर्भात वापरण्यामागे आहे. काही संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी शब्दार्थांना काव्याचे शरीर मानले. विशिष्ट शब्दरचनेमुळे निर्माण होणारी भाषाशैली म्हणजे त्यांच्या मते या काव्यरूपी शरीराच्या अवयवांची ठेवण. श्लेष, प्रसाद, समता, माधुर्य, अर्थव्यक्ती, उदारता, ओजस्, कांती आणि समाधी ह्या निरनिराळ्या रितींच्या दहा गुणांची तुलना त्यांनी शरीर धारण करणाऱ्या काव्यसुंदरीच्या स्वभावगुणांशी केली आणि अलंकार हे दागिन्यांप्रमाणे काव्यशरीरास शोभा देतात असे सांगितले. मेघदूतातील सर्व १२० श्लोक मंदाक्रांता ह्या एकाच वृतांत रचलेले आहेत. इंग्रजांच्या सेवेत असलेल्या त्या वेळच्या असिस्टंट सर्जन असलेल्या होर्यास हेमन विल्सन (१८१४ लंडन) यांनी तयार करून प्रसिद्ध केला. प्रत्येकाने 'मेघदूत' एकदा तरी वाचावे. स्व. शांता शेळके यांनी मराटीत अनुवादित केलेले 'मेघदूत' कुठेही मिळू शकते. खरे तर संस्कृतच वाचावयास पाहिजे, पण, सर्वांनाच संसकृत येत नाही, त्यामुळे कमीत कमी अनुवादित तरी वाचावे. आजच्या कालीदास दिनी त्या महान साहित्यकाराला वंदन करून थांबतो.



# जात्यावरच्या ओव्या......

एका मायचे लेकर
सारखाच तोंडवळा
नाक- डोळे धारदार
रंग गोपाळ -सावळा ||७४३||

एका मायचे लेकर
ओंजळीन पितृ पाणी
हात धरून हातात
गात् शाळेतली गाणी ||७४४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५०

ज्योतिर्मय 📖 साहित्य

या श्लोकात खऱ्या भक्ताचे आणखी एक सुंदर लक्षण समर्थ सांगतात. खरा भक्त प्रपंच तर करतो पण कसा? तर संसारात राहूनही तो त्यापासून अलिप्त असतो. तो विरक्त वृत्तीने जगतो. खरा भक्त असण्यासाठी भगवे कपडे, माळा, टिळा, टोपी, गंध इत्यादी धारण केले पाहिजे असे नाही. त्यासाठी कुठे वनात जावे लागत नाही. आपण संसारात राहून सुद्धा भगवंताचे लाडके भक्त होऊ शकतो.

कमलपुष्पाचे उदाहरण आपल्या सगळ्यांना माहिती आहे. कमळ चिखलात असते पण त्यात राहूनही ते त्यापासून दूर असते. असेच संसारात देखील राहता आले पाहिजे. संसाराची उपाधी खऱ्या भक्ताला असत नाही म्हणजेच त्याला संसाराचे पाश बांधू शकत नाहीत. संसारात असूनही तो मुक्त असतो, विरक्त असतो.



खऱ्या भक्ताचे आणखी एक सुंदर लक्षण समर्थ सांगतात. त्याचे बोलणे नम्र असते, बोलण्यात माधुर्य असते. आपल्या बोलण्याने तो कोणालाही दुखवत नाही. यासाठी वेगळे काही करावे लागत नाही. खऱ्या भक्ताच्या अंगी हे गुण आपोआप येतात. निवडणूक आली म्हणजे बरेच पुढारी अगदी नम्रतेने जनतेला सामोरे जातात. कार्पोरेट क्षेत्रातही कामाच्या गरजेपोटी नम्रता धारण केली जाते. पण हे सगळे मुखवटे असतात. आतले रूप वेगळ्याच असते. असे आपल्याला अनेक प्रसंगी आढळून येते. खरा भक्त हा अंतर्बाह्य निर्मळ असतो. मृदू सबाह्य नवनीत, तैसे सज्जनांचे चित्त. लोणी जेवढं मऊ आणि मुलायम असतं, तसंच सज्जनांचे चित्त असतं असं तुकाराम महाराज म्हणतात.

समर्थ रामदास किंवा संत तुकाराम यांच्यासारखे संत काही वेळा कठोरपणाने बोलताना दिसतात. पण त्यामागे समाज हिताची तळमळ असते. आई सुद्धा आपल्या मुलाला प्रसंगी रागावते, तर कधी चिडून '' मर मेल्या... ''असे सुद्धा उद्गारते. परंतु त्यातही तिचे प्रेम असते आणि मुलाच्या कल्याणाचाच विचार असतो. असेच संतांचीही बोलणे असते. जाणीवपूर्वक कोणाचेही मन दुखवावे म्हणून ते बोलत नसतात.


म्हणून आपणही परमेश्वराचे प्रिय भक्त होण्याचा प्रयत्न करावा. अहंकार, मत्सर आणि स्वार्थ बुद्धी यांच्यासारख्या दुर्गुणांचा त्याग करण्याचा प्रयत्न करावा. प्रपंचात रहावे, प्रपंच उत्तम करावा. परंतु ज्या काही गोष्टी घडतात, त्यांच्याकडे साक्षीभावाने पाहायला शिकावे म्हणजे आपल्याला त्या बंधनकारक होत नाहीत. अनावश्यक बोलणे टाळावे आणि जे काही आपण बोलू त्यात नम्रता आणि माधुर्य असावे. असा भक्त हा त्या सर्वोत्तम परमेश्वराचा जगातील सर्वोत्कृष्ट असा भक्त असतो.

स्वसंवाद : १) माझ्या बोलण्यात नम्रता आणि माधुर्य आहे का? की ते केवळ गरजेपुरते असते आणि आतमध्ये वेगळेच असते ?

२) माझ्या मनात कोणाबद्दल मत्सर किंवा द्वेष आहे का ?आणि त्याची मला जाणीव होते का ?

३) जीवनात मी साक्षीभावाने वागण्याचा प्रयत्न करतो का की संसारातील गोष्टी मला पूर्णपणे बांधून टाकतात ? (क्रमशः)

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२




## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559



✍️ यश

यश हे आपण केलेल्या कामाचे फळ असते, जेवढे जास्त चांगले काम कराल यश तेवढेच जास्त मिळेल. आळशी माणसाला हे कधीच मिळत नाही म्हणून यशासाठी मेहनत ही घ्यावीच लागते.

# काळजीचे मूळ कर्तेपणात आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय 📖 साहित्य

आनंद पाहायला आपल्याला दुसरीकडे कुठे जावे लागते का ? नाही. जो स्वत:च आनंदरूप आहे त्याने आपण होऊन ' मी दु:खी आहे ' असे मानून घेतले आहे. एकजण आपले तोंड आरशात पाहायला गेला, पण त्याला ते दिसले नाही. त्यावर दुसरा एकजण म्हणाला, ' मी दाखवितो. ' असे म्हणून आरशावर मळ बसला होता तो पुसून, त्याने आत पाहायला सांगितले, तेव्हा तोंड स्वच्छ दिसले. त्याचप्रमाणे साधू लोक करीत असतात. ते आपल्याला सांगत असतात की, तूच ब्रह्मरूप आहेस; म्हणजे तू स्वत:सिद्ध आणि आनंदरूप आहेस. परंतु आपण काय करतो, की हा प्रपंच माझा आहे असे समजतो, आणि त्यामुळे त्यांतले सर्व सुखदु:ख आपण आपल्यावर लादून घेतो. ज्याने तो उत्पन्न केला त्याला तो रक्षण करण्याची शक्ती असते आणि तो ते आपल्या इच्छेप्रमाणे करीतही असतो; पण तिथे आपल्यावर कर्तेपणा ओढून घेऊन आपण सर्व काळजी करीत बसतो. वास्तविक आपल्या हाती काय आहे ? परमात्म्याला काय करायचे ते तो करीत असतो, आपण मात्र काळजी करून शीण करून घेत असतो. म्हणूनच काळजी सोडून देऊन आपण भगवंताला शरण होऊन राहावे. आपण त्याचे होऊन राहिले म्हणजे आपल्याला सुखदु:ख होत नाही, आणि मग आपल्याला त्या आनंदाचा लाभ मिळतो.

काळजी ही मोठी विलक्षण असते. एका माणसाला आपल्या मुलाला चांगली नोकरी लागावी याची काळजी होती. पुढे त्याच्या मनाप्रमाणे नोकरी लागल्यावर, त्या मुलाच्या लग्नाची काळजी सुरू झाली. काही दिवसांनी लग्न झाले; मग पुढे सून चांगली वागत नाही म्हणून काळजी लागली. नंतर तिला मूल होईना म्हणून काळजी लागली. काही दिवसांनी तिला मूल झाले; त्या मुलाला फिट येऊ लागली म्हणून त्याला काळजी लागली. शेवटी आणखी काही दिवसांनी मुलाची फिट बरी झाली. पण त्या म्हाताऱ्यालाच फिट्स् येऊ लागल्या, आणि अखेर काळजी करीत करीतच तो मरून गेला. काळजी ही आपल्याला भगवंतापासून खरेच काळाच्या स्वाधीन करते. आपण काळाच्या स्वाधीन झालो की आपली बुद्धी भ्रष्ट होते. खरे म्हणजे काळजीचे मूळ माझेपणात आणि कर्तेपणात आहे, आणि खुद्द कर्तेपणाचे मूळ भगवंताच्या विस्मरणात आहे. व्यवहारी माणसे मोठी हुशार असतात; भगवंताला साक्षी ठेवून काळजी करतात ! हा तर त्याच्याहिपेक्षा मोठा गुन्हा आहे. ' काळजी लागणे स्वाभाविक आहे ' ही कल्पनाच आधी आपण मनातून काढून टाकली पाहिजे. आपली काळजी का सुटत नाही ? या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे आहे. काळजीने आपल्याला धरण्याच्या ऐवजी आपणच काळजीला घट्ट धरून ठेवतो, मग ती सुटणार कशी ? ज्याने भगवंत आपलासा करून घेतला त्याला काळजीचे कारण उरत नाही.

संकट आले तर काळजी करू नये. भगवंत करतो ते आपल्या हिताचे करतो ही दृष्टी ठेवावी.

***

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## आपले सण,आपलेउत्सव वट सावित्री पोर्णिमा

पुढे.....
आपण विवस्वान देवाचे पुत्र आहात. म्हणून आपणास वैवस्वान असे नाव, जाणकाराने दिले आहे. आपण सर्वांना समान न्याय देता. म्हणून आपणाला लोक, न्याय देवता म्हणतात. आपण त्या मर्यादेच्या बाहेर जाऊन कुणावरही कृपा करीत नाहीत. म्हणून सगळे लोक चांगुलपणाने वागणे श्रेयस्कर समजतात. चांगुलपणा व भूतदया हेण न्यायाचे दोन खांब आहेत.
यावर यम देव म्हणाले की, तू जे बोललीस, तसे आजवर कोणी माझ्या कौतुकाचे बोललेले नाही. मी तुला आणखी एक वर देणार आहे. पण तू सत्य वानाची मागणी करू नकोस.
सावित्री म्हणाली, माझ्या सासऱ्यांचा वंश, सत्यवानाच्या वीर्याने व माझ्या बीजाने वाढावा. असा वर मला द्या.
यम तिला तथास्तु म्हणतात!
यम म्हणतात, आता तरी पिच्छा सोड.
सावित्री म्हणाली, आपण मला वर दिला आहे. त्याप्रमाणे आपल्याला माझा पती माझ्याकडे सोपवावा लागेल. तो आशीर्वाद पूर्ण होण्यासाठी, हे आवश्यक आहे. ही सृष्टी अविरत चालावी यासाठी, चांगुलपणा आवश्यक असतो.
चांगुलपणा व भूत दया हे गुण ज्याचे पाशी नाहीत, त्यालाच असुर, राक्षस म्हणतात. (क्रमश)

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### "व्यक्ती ते राष्ट्र कसे ??"

आज स्वंतत्र आणि डिझीटल भारतात नवा शोषणमुक्त, अन्यायरहित व विषमताशुन्य समाज निर्माण व्हावा, अशी अपेक्षा सामान्य ते विद्वान याचीसर्वाची असते.पण असा समाज आज नजरेला दिसेल का?ही केवळ कल्पन आहे की वस्तुस्थिती? प्रथम तर आपण प्रत्येक व्यक्तीपासून राष्ट्र हेच आपण विसरत आहोत!! आपल्याजवळ जे आहे त्याच सदुपयोगकरणे,याचेनाव शहानपण.आणि शहानपण म्हणजे व्यक्तीमत्व आणि व्यक्तिमत्व म्हणजे पुरूषार्थ! मग समाज कार्य व मग राष्ट्र कार्य असा हा चढताक्रम आहे!!समाज ऋण फेडण्यासाठी तसे व्यक्तिमत्व प्राप्त करावे हे विसरले की घोटाळे होतात.व्यक्तीतून समाज ते सभ्यता-कार्ये म्हणजे शोध निर्माण होतात.पण आज सर्वत्र संहारकता दिसते.त्या साठी प्रत्येकाने संरक्षित संस्कृती जगले पाहिजे. सध्या कोणत्याही दैनिकात,समाजा त घडणार्या क्रूर, गुन्हेगारी, व विकृत घटना डोके चक्रातून टाकणार्या आहेत.मीपणा प्रचंड वेगाने वाढत आहे.हे समाजचित्र भयावल आहे. भ्रष्टाचार गुंडगिरी आणि व्यभिचार तर पावलोपावली दिसतात. नीतीअनिती; मानापमान, ऊच्चनिचता, लहानमोठा हा भेदभाव नाहीच जणू!!चंगलवादीपणा वाढून आपण आपल्याच पायावर कुर्हाड मारून घेत आहोत. या सगळ्याच्या मूळापर्यंत जाऊ न कारण, ऊपाय, शोधावे लागतील, त्यासाठीचं विचार मंथन सगळ्यांनी मिळून करावं लागल. तेव्हा वेळीच सावध व्हा.. तुर्त एवढे मंथनपुरे. ईथंच थांबतो स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा.

# आरोग्य संजीवनी



# शेवग्याच्या शेंगेचे फायदे

ज्योतिर्मय 📖 साहित्य

आपला देश फळं, भाज्या यांच्याबाबतीत खूप समृद्ध आहे. मांसाहाराच्या तुलनेत इथं शाकाहाराला अधिक प्राधान्य दिलं जातं. आयुर्वेदासारखी अनमोल देणगीही आपल्याला लाभली आहे. आपल्याकडे उपलब्ध असणाऱ्या अनेक भाज्यांचे औषधी गुणधर्म आता जगालाही पटले असून, जगभर त्याचा प्रसार होत आहे. अशीच एक भाजी आहे शेवग्याची शेंग. इंग्रजीमध्ये याला ड्रमस्टिक किंवा मोरिंगा म्हणतात. विशेष म्हणजे आपला देश शेवग्याचा अर्थात मोरिंगाचा सर्वात मोठा उत्पादक आहे.

शेवग्याचं झाड अतिशय वेगानं वाढतं.

त्याच्या शेंगांबरोबरच पानं, फुलंदेखील खाण्यासाठी वापरली जातात. या झाडाचे हे तीनही भाग खूप फायदेशीर आहेत. शेवग्यामध्ये प्रथिनं, अमीनो ॲसिडस्, बीटा-कॅरोटीन आणि वेगवेगळ्या प्रकारचे फिनॉलिक असतात जे उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरतात.

शेवग्याच्या शेंगेचे फायदे :

शेवग्याच्या शेंगेमध्ये मुबलक प्रमाणात कॅल्शियम असते.

- मुलांसाठी याचा खूपच फायदा होतो. यामुळं हाडं आणि दात मजबूत होतात.
- शेंगा खाल्ल्यानं गर्भवती महिलांना भरपूर कॅल्शियम मिळतं.
- लठ्ठपणा आणि अतिरिक्त साठलेली चरबी कमी करण्यास याची मदत होते.
- यात फॉस्फरसचे प्रमाण जास्त असल्यानं जास्तीच्या कॅलरी कमी होतात.
- याच्या सेवनानं रक्त शुद्ध होते.
- या शेंगा खाल्ल्यानं गर्भवती महिलांना प्रसूतीच्या वेळी जास्त वेदना होत नाहीत.
- कर्करोगावरही शेवग्याच्या शेंगा खूप फायदेशीर ठरतात.
- मधुमेह, हृदयविकार यावरही शेवगा गुणकारी ठरतो.
- यकृतच्या आरोग्यासाठीही शेवगा लाभदायी आहे.
- रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठीदेखील शेवगा उपयुक्त ठरतो.
- त्वचेसाठीही शेवगा खूप फायदेशीर आहे.

शेवग्याची पाने कशी वापरावीत:

शेवग्याच्या पानांमध्ये उच्च रक्तदाब नियंत्रित करण्याचे गुणधर्म असतात. उच्च रक्तदाब असणाऱ्या रुग्णांनी शेवग्याच्या पानांचे पाणी आवर्जून प्यावे. यासाठी एक ग्लास पाण्यात शेवग्याची थोडी पाने टाकून ते पाणी उकळा. पाणी उकळून अर्धे झाल्यावर ते थंड करून घ्या. नंतर ते पाणी गाळून घ्यावं आणि प्यावं. रक्तदाब वाढलेला असेल तेव्हा सलग दोन दिवस हे पाणी प्या. त्यानंतर रक्तदाब कमी झाल्यानंतर हे पाणी दोन दिवसांच्या अंतरानं घ्या. या काळात दररोज आपला रक्तदाब तपासा ज्यामुळं रक्तदाब किती कमी झाला आहे, हे समजेल. त्यानंतर आठवड्यातून एकदा हे पाणी पिणं योग्य ठरेल.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### रिंगण

हरी नाम मुखी
घेवूनी पहा आनंदे
वारी चालतो वारकरी
फेर धरुनी सारे
रिंगण छान घालती
मेळा जमला पंढरी

गळा तुळशीमाळ शोभे
हाती मृदंग,चिपळी
रिंगण छान घातले
झिम्मा,फुगडी खेळताना
हरपता भान सर्वांचे
मन भक्तीत रंगले

# यज्ञेश कातबने यांना शासनाचा वनश्री पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय साहित्य**

धनगाव येथील महाराष्ट्र शासन युवा शेतकरी पुरस्कार प्राप्त तथा शेतकरी - शास्त्रज्ञ फेलो, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, प्रयोगशील शेतकरी यज्ञेश वसंतराव कातबने यांना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठेचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार २०२४ हा सन्मान जाहीर झाला आहे.पैठण तालुक्याला प्रथमच हा सन्मान लाभला आहे. राज्यस्तरावरील अत्यंत मानाचा हा पुरस्कार त्यांना जाहीर झाल्यामुळे सर्वत्र त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे.

निसर्ग आणि पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी निस्वार्थ भावनेने केलेल्या समर्पित कार्याचा हा सन्मान असून, त्यांच्या या यशामुळे पर्यावरण क्षेत्राचा गौरव अधिक उंचावला आहे. वृक्ष लागवड,वृक्षसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि जनजागृतीसाठी केलेले सातत्यपूर्ण व उल्लेखनीय कार्य समाजासाठी प्रेरणादायी कार्य करत आहे.

पर्यावरण संवर्धनाची ही चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी कार्य असेच वृद्धिंगत होत चालले आहे. कृषि वसंत फॉर्मच्या माध्यमातून इकोझोन



निर्मिती,पर्यावरणपूरक शेती,बांधावरील झाडांचे संगोपन,तसेच मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड,वृक्ष संगोपन या साठी योगदान दिले आहे,त्या मुळेच शासन पातळीवर या कार्याची दखल घेतली गेली व त्यांना मानाचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार जाहीर केला आहे.या बद्दल सर्वच क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र शासन वन विभाग यांच्या वतीने दिला जाणारा ''छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार'' सन-२०२४ करिता मला जाहीर झाला.

माधववृंद दिनाच्या पूर्वसंध्येला हा सन्मान जाहीर होणे,हा माझ्यासाठी निश्चित प्रभूस्पर्श आहे. पर्यावरण क्षेत्रातील सर्वात मोठा आणि भविष्यासाठी खूप महत्त्वाचा हा पुरस्कार आहे.

कृषिरत्न वसंतराव कातबने ह्यांचं कृषिक्षेत्रातील प्रदीर्घ,अजोड, प्रचंड योगदान,आपल्या सर्वांचं प्रेम, परिवाराची भक्कम साथ आणि खूप मोठ्या मित्र परिवाराच्या सहकार्याने राज्यसरकारचा ''छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार'' मिळाला आहे. ह्यासाठी मी वन विभाग,महाराष्ट्र सरकारचे आभार मानतो.

# वैजापूरात जेष्ठ नागरिक आयुष्यमान भारत कार्ड, उद्यम प्रमाणपत्र व एसआयआर जनजागृती शिबीर

**ज्योतिर्मय साहित्य**

वैजापूर - येथील गोरख मापारी सेतू सुविधा केंद्र, तसेच सामाजिक कार्यकर्ते सोनू राजपूत मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ७० वर्ष वयावरील जेष्ठ नागरिकाना आयुष्यमान भारत कार्ड, महात्मा फुले आरोग्य कार्ड, तसेच युवकांना उद्यम प्रमाण पत्र, व एसआयआर मतदार यादी पुनरीक्षण बाबत माहिती मिळावी म्हणून नुकतेच संत सेना महाराज समाज मंदिरात जनजागृती शिबीर घेण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते सोनू राजपूत, धोंडीरामसिंह राजपूत, गोरख मापारी यांनी उपस्थिताना वरील विषयाबाबत मार्गदर्शन करूनआवश्यक कागद पत्रांची पूर्तता केल्यास मापारी सुविधा केंद्रातून प्रमाण पत्र उपलब्ध करून देण्यात येईल असे मार्गदर्शन केले. मतदार यादी पुनरीक्षण बाबत ही मार्गदर्शन करून मतदारांनी लवकरात लवकर नोंदणी करावी असे आवाहन केले. यावेळी काही नागरिकांना प्रमाण पत्र व कार्ड वितरित करण्यात आले. या प्रसंगी सोनू राजपूत मित्र मंडळ, गणेश महापुरे, प्रशांत त्रिभुवन, अभिजित लोखंडे, विकास पडवळ, राहुल गायकवाड, पंडित खरात, अभिषेक



दाढे, काका लाडवाणी, मोहक निकम, प्रतीक अनर्थे, हिमांशू चव्हाण, शुभम लिंगायत यांनी सहकार्य केले.



Mutual Fund Online
Sahi hai.....
म्युच्युअल फंड ऑनलाईन
विनोद शिराळकर 9325383999

## EMI चे चक्रव्यूह

या चक्रातून बाहेर पडण्यासाठी 'फक्त दिवस ढकलणे' सोडून 'परिस्थितीवर मात करणे' गरजेचे आहे. यासाठी आर्थिक साक्षरता (Financial Literacy) वाढवणे, उपलब्ध असलेल्या छोट्या साधनांमधून प्रगती कशी करता येईल हे पाहणे आणि वाईट परीस्थीतीला सुरुवातीलाच आपल्या आयुष्याचा शेवट मानण्यास नकार देणे आवश्यक आहे.

पिढ्यानपिढ्यांचे ओझे असलेली

गरिबी हा केवळ एका व्यक्तीचा संघर्ष नसतो; तिचे पडसाद पुढच्या पिढ्यांवर उमटतात. जेव्हा एखादी व्यक्ती परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न न करता ती शांतपणे स्वीकारते, तेव्हा तोच संघर्ष पुढच्या पिढीच्या पदरात पडतो. गरिबीला नकार देणे हे केवळ स्वतःच्या सुखासाठी नसते, तर पुढच्या पिढीला एका चांगल्या पातळीवरून सुरुवात करता यावी यासाठी दिलेला लढा असतो.

गरीब असणे ही एक बाह्य परिस्थिती आहे. परंतु गरिबी स्वीकारणे ही एक मानसिक अवस्था आहे, जी तुमची परिस्थिती बदलण्याची ताकद आणि स्वाभिमान हिरावून घेते.

अत्यंत प्रतिकूल वातावरणातही, "हे माझे कायमचे नशीब नाही, तर ही एक तात्पुरती समस्या आहे जी मला सोडवायची आहे" असा विचार करण्यासाठी आणि पाऊल उचलण्यासाठी खूप मोठे धैर्य लागते

# विद्यार्थ्यांना संविधान युवा मंचच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप

**ज्योतिर्मय साहित्य**

वैजापूर : भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न, ज्ञानसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती वर्ष निमित्ताने ''एक पेन -एक वही''अंतर्गत संकलित झालेले शैक्षणिक साहित्य सोमवार (ता.१३) रोजी येथील पीएमश्री मौलाना आझाद विद्यालयातील विद्यार्थ्यांना तालुक्याचे आ. प्रा.रमेश पा. बोरनारे, माजी नगराध्यक्षा शिल्पा परदेशी, शिक्षण सभापती बाबासाहेब पुतळे, राजेंद्र पा. साळुंके, नगरसेवक विशाल संचेती, पारस घाटे, प्रकाश चव्हाण,आमीर अली, जि..सदस्य श्रीराम गायकवाड, सेवा निवृत्त शिक्षणांधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते ठा. धोंडीरामसिंह राजपूत, गट विकास अधिकारी एच.आर.बोयनार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

प्रथम महात्मा जोतिबा फुले, डॉ,बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, अण्णा भाऊ साठे, यांच्या प्रतिमांना अभिवादन करून दीप प्रज्वलित करण्यात आले. प्रास्तविक श्रीकांत जाधव यांनी केले. आ,बोरनारे,शिल्पा परदेशी, व धोंडीराम राजपूत यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व जोतिबा फुले, शाहू महाराज यांच्या शैक्षणिक




विचारांचे महत्व विशद करीत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी हे शैक्षणिक सहित्य उपयुक्त ठरेल असे प्रतिपादित केले. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, व क्रीडाविषयक विकासासाठी वसंत क्लब मैदान उपलब्ध करून देण्यात येत आहे असे आ.बोरनारे यांनी आश्वासन दिले. या संविधान युवा मंचचे अध्यक्ष जीवन पठारे, कार्याध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन, उपाध्यक्ष श्रीकांत जाधव, सतिश त्रिभुवन, राहुल त्रिभुवन, सचिन त्रिभुवन, अंकुश त्रिभुवन,(हनुमंत गाव) यांनी सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला.

या प्रसंगी तहसीलदार सुनील सावंत, मंडळ अधिकारी गजानन जाधव यांनी ही भेट दिली. मुख्याध्यापक बी.बी.जाधव व शिक्षकवृंद यांनी सहकार्य केले. या प्रसंगी माजी नगरसेवक रमेश हाडोळे, शैलेंश चव्हाण,

ज्ञानेश्वर टेके. साहेबराव पडवळ, पत्रकार विलास म्हस्के, अण्णासाहेब ठेंगडे, जगन गायकवाड, प्रमोद पठारे, शिवा थोरात, नामदेव त्रिभुवन, अनिल आल्हाट, प्रल्हाद सातुरे, मोती वाघ,यांच्या सह शालेय शिक्षक, उपस्थित होते. सुवर्णा बोर्डे यांनी सूत्र संचलन केले. जीवन पठारे यांनी आभार मानले. संविधान युवा मंच च्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




## सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'आजी' (संस्कारांची शिदोरी)

पुढे......

या दोन्ही आज्यांच्या छायेत वाढणारं मूल आयुष्याच्या बाजारात कधीच अपयशी ठरत नाही. खरं तर नातवंडांना दुधावरची साय म्हटलं जातं, पण अंगावर सुरकुत्या पडलेल्या आजीची माया या दुधावरच्या सायीसारखीच घट्ट आणि समृद्ध असते!

मला माझी आजी आठवते. तिच्याबद्दल या ठिकाणी थोडं सांगणं नक्कीच अनुचित होणार नाही. माझं बालपण एका अगदी छोट्याशा खेडेगावात गेलं. मी साधारण चौथीच्या वर्गात असेपर्यंत माझी आजी आमच्यासोबत होती; त्यामुळे मला ती अगदी स्पष्ट आठवते. आजी फारशी शिकलेली नव्हती, पण तिच्याजवळ पारंपरिक आणि अनुभवजन्य ज्ञानाचे अथांग भांडार होते. ती अतिशय प्रगत विचारांची होती, नवीन चांगल्या गोष्टींना तिचा कधीच विरोध नसायचा.

मी बाहेरून खेळून आलो की आजी मला आधी सक्तीने हातपाय धुवायला लावायची; त्याशिवाय पाणी पिण्यासाठी माठाकडे जाऊ देत नसायची. मला तर खेळून आल्यामुळे तीव्रतेने तहान लागलेली असायची, त्यामुळे त्यावेळी मला कधी कधी तिचा खूप राग यायचा. पण आज मोठं झाल्यावर, जगाचा अनुभव आल्यावर कळतं की तिचं ते सांगणं आरोग्याच्या दृष्टीने किती बरोबर होतं! कोरोनाच्या भीषण काळात तर आपण सर्वजण याच गोष्टीबाबत अगदी दक्ष राहायला लागलो होतो, जी शिस्त आजीने आपल्याला बालपणीच लावली होती. लहनपणी आम्हाला 'आजीचे घड्याळ' या नावाची एक सुंदर कविता होती. माझी आजी अगदी तशीच होती! तिच्याजवळ घड्याळ नव्हतं, पण तिच्या सगळ्या गोष्टी अगदी वेळच्या वेळी व्हायच्या. (क्रमशः)

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### सत्यम् अनंतम् शाश्वतम् ब्रह्म




आजचे चिंतन

१. आपण परंपरांचे पालन समजून करतो की केवळ सवयीपोटी?

२. आधुनिक होणे म्हणजे आपल्या संस्कृतीच्या मुळांपासून तुटणे का?

३. एखादी परंपरा जपायची की बदलायची, याची योग्य कसोटी कोणती असावी?

"जी संस्कृती आपल्या शाश्वत मूल्यांचे रक्षण करत परिवर्तन स्वीकारण्याचे धैर्य दाखवते, तीच खऱ्या अर्थाने जिवंत संस्कृती असते."

रूढीवाद आणि परिवर्तन – भारतीय तत्त्वज्ञानातील 'सुवर्णमध्य'

भारतीय संस्कृती ही ना अंधरूढीवाद स्वीकारते, ना अंध-आधुनिकता. ती विवेकाचा सुवर्णमध्य स्वीकारते.

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात–

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ (भगवद्गीता ६.१७)

अर्थ : आहार, विहार, कर्म, झोप आणि जागरण या सर्व बाबतीत संयम व समतोल राखणाऱ्यालाच योग प्राप्त होतो.

यावरून स्पष्ट होते की, भारतीय संस्कृती कोणत्याही टोकाच्या भूमिकेचे समर्थन करत नाही; ती समतोलाचा मार्ग शिकवते.

विवेकाची कसोटी

आदि शंकराचार्य 'विवेकचूडामणि' मध्ये म्हणतात–

ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः।

याचा गाभा असा की, नित्य आणि अनित्य यांतील विवेक ओळखणे हेच खरे ज्ञान आहे.

म्हणूनच परंपरेतही जे नित्य, शाश्वत आणि कल्याणकारी आहे ते जपावे; आणि जे अनित्य, कालबाह्य किंवा अहितकारक झाले आहे त्याचा पुनर्विचार करावा.

## सेवेतून सापडलेला देव



अमोल बोरीकर



वारीच्या वाटेवर मुसळधार पाऊस पडत असतो. चिखलाने भरलेल्या रस्त्यावर एक वृद्ध वारकरी थकून खाली बसतो. पायांना फोड आलेले... डोळ्यांत वेदना... तरीही ओठांवर मंद स्वरात "विठ्ठल... विठ्ठल..." सुरूच असतो. इतक्यात दिंडीतला एक तरुण मागे वळतो. तो त्या वृद्धाला अलगद उचलतो, स्वतःच्या खांद्यावर त्यांची पिशवी घेतो, पाण्याची बाटली पुढे करतो आणि म्हणतो, "माऊली... अजून थोडंच अंतर आहे. चला, आपण दोघं मिळून विठुरायाकडे जाऊ."

त्या क्षणी त्या वृद्धाच्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रू पावसाच्या थेंबांमध्ये मिसळून जातात. त्याला विटेवरचा विठ्ठल अजून दिसलेला नसतो... पण त्या तरुणाच्या रूपाने विठ्ठल त्याला आधीच भेटलेला असतो.

या निस्वार्थी सेवेचे मर्म सांगताना संत कबीर म्हणतात:

"कबीर मानस मानवा, सब सो एको रूप। कोई सेवा में हरि मिले, कोई भजे स्वरूप॥"

आणि आपल्या वारकरी संप्रदायात तर "जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले। तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा॥" हाच सर्वोच्च विचार आहे.

वारी आपल्याला एक अद्भुत सत्य शिकवते– देव शोधावा लागत नाही; तो सेवेत सापडतो. म्हणूनच वारकऱ्यांच्या दिंडीत कुणी उपाशी राहत नाही, कुणी तहानलेला राहत नाही आणि कुणी दुःखात एकटा राहत नाही. एखादी माऊली स्वतःच्या ताटातील अर्धी भाकरी अनोळखी वारकऱ्याला देते, एखादा युवक वृद्धाच्या पिशवीचं ओझं स्वतःच्या खांद्यावर घेतो, तर एखादं लहान मूलही पाण्याचा घोट पुढे करतं. त्या प्रत्येक कृतीत विठ्ठल हसत असतो.

आज आपण देवळात जाऊन देवाला नमस्कार करतो; पण अनेकदा आपल्या शेजारी उभ्या असलेल्या दुःखी माणसाकडे पाहायलाही विसरतो. वारी मात्र सांगते–मंदिरातील दर्शन काही क्षणांचं असतं, पण माणसाची सेवा हीच आयुष्यभराची पूजा असते.

पंढरपूरचं दर्शन काही क्षणांचं असतं. पण सेवेने मिळालेलं देवदर्शन आयुष्यभर मनात जिवंत राहतं. कारण मूर्तीसमोर उभं राहिल्यावर हात जोडले जातात; पण माणसाच्या सेवेसाठी पुढे आले की मन जोडली जातात.

विटेवरचा विठ्ठल प्रत्येकाला दिसतो... पण दुसऱ्याच्या वेदनेत स्वतःचं दुःख पाहणाऱ्यालाच सेवेतून सापडलेला विठ्ठल दिसतो. आणि त्या क्षणी भक्त आणि भगवान यांच्यातील अंतर कायमचं संपून जातं.


# अस्वस्थ करणारे प्रश्न, जागृत करणारे विचार : 'कुठे आहे लोकशाही?'

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी साहित्यात समाजप्रबोधनाची परंपरा संत साहित्यापासून ते फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारधारेपर्यंत अखंडपणे प्रवाहित होत आलेली आहे. या परंपरेचा वारसा जपत तरुण लेखक बुद्धभूषण कांबळे यांनी लिहिलेला ''कुठे आहे लोकशाही?'' हा ललित लेखसंग्रह समाजातील विविध प्रश्नांवर भाष्य करणारा, विचारांना चालना देणारा आणि वाचकाला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ ठरतो. पुस्तकाचा केंद्रबिंदू लोकशाही असला तरी त्यामध्ये केवळ राजकीय लोकशाहीचा विचार नाही; तर सामाजिक, नैतिक आणि मानवी मूल्यांच्या लोकशाहीचाही शोध घेतला आहे.

पुस्तकाचे मुखपृष्ठ  सरदार जाधव यांनी रेखाटले असून ते अत्यंत आकर्षक आणि बोलके आहे. प्रस्तावना किर्तनकार व साहित्यिक माधव डाके यांची असून महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूरचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांचा अभिप्राय लाभला आहे. पुस्तकाच्या मलपृष्ठावर ज्येष्ठ साहित्यिक भरत सातपुते यांची पाठराखण आहे.

या लेख संग्रहात लेखकाने समाजातील विविध समस्या, मानवी नातेसंबंध, शिक्षण, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, पर्यावरण, बेरोजगारी, पालक आणि विद्यार्थ्यांचे नाते, मतदानाचे महत्त्व, स्त्रीभ्रूणहत्या, मोबाईलचा अतिरेकी वापर अशा अनेक विषयांवर परखडपणे भाष्य केले आहे. ''कुठे आहे लोकशाही?'', ''बेरोजगारी एक भीषण समस्या'', ''मोबाईलचा अति वापर धोकादायक'', ''विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर संस्कार'', ''अंधश्रद्धेच्या विळख्यात भारत'' यांसारखे लेख समाजातील वास्तवाला स्पर्श करतात.





लेखकाची लेखनशैली ही या पुस्तकाची सर्वात मोठी जमेची बाजू आहे. अवघड आणि क्लिष्ट शब्दांचा अतिरेक न करता साध्या, सरळ आणि प्रभावी भाषेत त्यांनी आपले विचार मांडले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील सामान्य वाचकापासून ते सुशिक्षित वाचकांपर्यंत प्रत्येकाला हे लेख सहज समजतात. प्रत्येक लेखात सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि परिवर्तनाची तळमळ प्रकर्षाने जाणवते. लेखक केवळ समस्या मांडून थांबत नाही, तर त्या समस्यांवर विचार करण्यास आणि उपाय शोधण्यासही प्रवृत्त करतो.

''कुठे आहे लोकशाही?'' या शीर्षक लेखात लोकशाहीच्या मूळ मूल्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मतदानाच्या वेळी पैशाच्या आणि प्रलोभनांच्या आधारे मतांची खरेदी-विक्री होत असल्याने लोकशाहीचा आत्माच हरवत चालल्याची खंत लेखक व्यक्त करतो. लोकप्रतिनिधी निवडताना नागरिकांनी सजग राहण्याची आवश्यकता तो अधोरेखित करतो. हा लेख वाचताना लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून ती जबाबदार नागरिकत्वाची जीवनपद्धती आहे, याची जाणीव होते.

या पुस्तकातील लेखांमध्ये मानवी मूल्यांविषयीची आस्था विशेषत्वाने दिसून येते. आजच्या स्वार्थी आणि स्पर्धात्मक युगात माणुसकी, परस्पर प्रेम, कृतज्ञता, नाती जपण्याची भावना आणि सामाजिक उत्तरदायित्व यांची गरज लेखक वारंवार अधोरेखित करतो. ''जीवनात माणसे जपायला शिका'', ''माणूस माणसासारखा का वागत नाही?'' यांसारखे लेख मानवी संवेदनांचा शोध घेतात. त्यामुळे हा संग्रह केवळ लेखांचा संच राहत नाही, तर जीवनमूल्यांचा मार्गदर्शक ठरतो.

लेखकावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत परंपरा आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.




समाजातील अंधश्रद्धा, विषमता, अन्याय आणि अज्ञान यांविरुद्ध लेखकाने निर्भीडपणे आवाज उठवला आहे. त्याचवेळी शिक्षण, विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नैतिकता यांचे महत्त्वही पटवून दिले आहे. त्यामुळे पुस्तकाला वैचारिक अधिष्ठान प्राप्त झाले आहे.  एकंदरीत, ''कुठे आहे लोकशाही?'' हा लेखसंग्रह आजच्या समाजाचे वास्तव चित्रण करणारा, सामाजिक जाणीवा जागृत करणारा आणि मूल्याधिष्ठित जीवनाची दिशा दाखवणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे.

तरुण वयात लेखकाने दाखवलेली सामाजिक बांधिलकी, निरीक्षणशक्ती आणि प्रबोधनाची तळमळ निश्चितच कौतुकास्पद आहे. समाजातील बदलत्या प्रवाहांचे चिकित्सक विश्लेषण करणारे हे पुस्तक प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ता आणि जागरूक नागरिकाने अवश्य वाचावे असे आहे. वाचकाच्या मनात अनेक प्रश्न निर्माण करून त्याला विचारांच्या नव्या क्षितिजाकडे घेऊन जाण्याची ताकद या पुस्तकात आहे. म्हणूनच ''कुठे आहे लोकशाही?'' हा केवळ लेखसंग्रह नसून समाजपरिवर्तनाची हाक देणारा एक प्रभावी वैचारिक दस्तऐवज आहे. साध्या सरळ सोप्या भाषेत असलेले या पुस्तकातील त्यांचे लेख ही आपलेपणाची भाषा वाटते. या पुस्तकात अलंकारिक रचना किती आहे यापेक्षा माणुसकीचा अलंकार इथे समृद्ध व सजग आहे. बाबासाहेबांचे आचार व विचार, बाबासाहेबांचा आदर्श हा अनेक लेखात बुद्धभूषण कांबळे यांनी मांडला आहे तो विचार प्रत्येकाच्या आचरणात आला तर इथली लोकशाही समृद्ध होईल असे वाटते. असो, कांबळे यांच्या या लेख संग्रहाच्या माध्यमातून त्यांनी पोटतिडकीने मांडलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांना मिळायला हवीत असे मनोमन वाटते. शेवटी त्यांनी लिहिलेला हा लेख संग्रह वाचकांच्या पसंतीस नक्की उतरेल असा विश्वास वाटतो.

पुस्तकाचे नाव : कुठे आहे लोकशाही?

लेखक : बुद्धभूषण कांबळे

पृष्ठे :- २४० किंमत :  ४५०/- रुपये

***




# भाषा समृद्ध कशी होते? (भाग ६ )

**ज्योतिर्मय साहित्य**

शब्दांचे महत्त्व समजून घेतल्यानंतर पुढचा प्रश्न असा निर्माण होतो की, भाषा समृद्ध कशी होते? नवे शब्द भाषेत कसे येतात? आणि जुने शब्द टिकून कसे राहतात? मला आठवते, नववीत असताना (१९६६ साली) आमच्या अभ्यासक्रमात भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी हा धडा होता. त्याचे लेखक होते श्री. म. माटे. त्या धड्यात त्यांनी मांडलेला एक विचार आजही माझ्या स्मरणात ताजा आहे.

त्यांच्या मते, समाजातील विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तींनी आपल्या अनुभवांवर लिहायला सुरुवात केली, तर त्या त्या क्षेत्रांतील शब्द भाषेत प्रवेश करतात आणि भाषा अधिक समृद्ध होत जाते. उदाहरणार्थ, एखादा क्रिकेटपटू एखाद्याच्या अपयशाचे वर्णन करताना म्हणेल, ''त्याची दांडी उडाली.'' इतिहासाचा अभ्यास करणारा लेखक त्याच प्रसंगासाठी ''त्याचे पानिपत झाले.'' असा वाक्प्रचार वापरेल. दोघेही ''पराभव'' हाच अर्थ व्यक्त करीत असले, तरी त्यांच्या अनुभवविश्वामुळे भाषेला नवे रंग, नवी रूपके आणि नवी अभिव्यक्ती मिळते. यालाच भाषेची वाढ म्हणतात, परंतु भाषा समृद्ध करणे हा पुढचा टप्पा आहे. सर्वप्रथम आवश्यक आहे ती आहे ती भाषा जपणे, आणि भाषा जपण्याचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे तिचा नियमित वापर करणे.

आपण प्रत्येकाने स्वतःशी एक छोटासा संकल्प केला, तरी मोठा बदल घडू शकतो.

जिथे शक्य असेल, तिथे मी केवळ आयकॉन, चिन्ह किंवा स्माईली न वापरता, त्याऐवजी शब्द वापरीन.

उदाहरणार्थ, ''मला आनंद झाला'', ''मला हे खूप आवडले'', ''मला वाईट वाटले'', ''किती सुंदर!'', ''मी सहमत आहे,'' ''माझे मत थोडे वेगळे आहे''. अशी दोन-चार वाक्ये लिहिण्यास काही क्षण अधिक लागतील; पण त्यातून आपला शब्दसंग्रह सतत जागृत राहील.

मानवी मेंदू हा अत्यंत प्रामाणिक आणि आज्ञाधारक सेवक आहे. आपण जी कृती वारंवार करतो, तीच त्याला महत्त्वाची वाटू लागते. एखादा शब्द सतत वापरला, तर तो दीर्घकाळ स्मरणात राहतो. उलट, जो शब्द वर्षानुवर्षे वापरलाच जात नाही, तो मेंदू हळूहळू दुय्यम ठरवतो. नंतर तो शब्द केवळ ओळखीचा वाटतो; त्याचा सहज वापर मात्र होत नाही. काही काळानंतर तो पूर्णपणे विस्मृतीतही जाऊ शकतो. यामुळेच शब्दांचा नियमित वापर हा केवळ भाषेच्या संवर्धनासाठी नसून, स्मरणशक्तीच्या संवर्धनासाठीदेखील आवश्यक आहे.

भाषेचे अस्तित्व केवळ शब्दकोशात नसते; ते लोकांच्या जिवंत व्यवहारात असते, म्हणूनच भाषा जपायची असेल, तर तिचे शब्दही जपावे लागतील आणि शब्द जपायचे असतील, तर त्यांचा सातत्याने वापर करावाच लागेल.

(क्रमशः  भाग ७: माझा मराठीची बोल कवतुके  भाषा वाचविण्याची खरी जबाबदारी)

# महाकवी कालिदास शब्दांचा अमर जादूगार

**ज्योतिर्मय साहित्य**

''आषाढस्य प्रथम दिवसे''. आकाशात काळेभोर ढग दाटून आले आहेत पृथ्वीने हिरवा शालू नेसला आहे. मातीचा मंद सुगंध दरवळत आहे. मोर आनंदाने पिसारा फुलवून नाचत आहेत. शेतकरी पावसाच्या पहिल्या सरींचे स्वागत करत आहे. निसर्गाच्या या मंगल क्षणी भारतीय साहित्यविश्व एका महान कवीची आठवण काढते. मराठी पंचांगानुसार आषाढमहिन्याचा पहिला दिवस हा महाकवी कालिदासांचा स्मृतिदिन (कालिदास जयंती) म्हणून साजरा केला जातो. कारण पावसाळ्याचे, ढगांचे आणि निसर्गसौंदर्याचे जितके जिवंत, हृदयस्पर्शी आणि अलौकिक वर्णन कालिदासांनी केले, तितके क्वचितच अन्य कोणत्याही कवीने केले असावे

भारतीय संस्कृतीच्या विशालआकाशात अनेक तारे चमकले, परंतु त्यांच्यामध्ये एक असा ध्रुवतारा आहे, ज्याचे तेज आजही हजारो वर्षांनंतर तितक्याच दिमाखाने झळकत आहे. त्या ध्रुवताऱ्याचे नाव म्हणजे महाकवी कालिदास. त्यांच्या लेखणीतून उमललेला प्रत्येक शब्द जणू सुवर्णकमळासारखा भासतो. त्यांच्याकाव्यात निसर्गाचे सौंदर्य, प्रेमाची निर्मळता, ऋतूंचे वैभव, मानवी भावना आणि भारतीय संस्कृतीचे दिव्य दर्शन घडते. म्हणूनच त्यांना '' संस्कृत साहित्यातील सम्राट'' असे गौरवाने संबोधले जाते.

कालिदासांचा जन्म आणि जीवन

कालिदासांचा जन्म नेमका केव्हाआणि कोठे झाला, याबाबत इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. बहुतेक विद्वानांच्या मते ते इ.स.पूर्व पहिल्या शतकापासून ते इ.स. पाचव्या शतकाच्या दरम्यान त्यांचा जन्म झाला असावा असा अंदाज आहे. ते उज्जैनचे महान सम्राट विक्रमादित्य यांच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक होते, अशी लोकप्रिय परंपरा आहे.

त्यांच्या जीवनाशी निगडित एकप्रसिद्ध आख्यायिका सांगितली जाते. सुरुवातीला ते अशिक्षित होते. काही विद्वानांनी त्यांची थट्टा करण्यासाठी त्यांचा विवाह विदुषी विद्योत्तमा हिच्याशी लावून दिला. विवाहानंतर आपल्या अज्ञानाची जाणीव झाल्यावर कालिदासांनी देवी कालीची कठोर उपासना केली. देवीच्या कृपेने त्यांना विलक्षण ज्ञान प्राप्त झाले आणि ते कवी बनले.

ही कथा ऐतिहासिकदृष्ट्या सिद्ध नसली तरी ती एक अमूल्य संदेश देतेजिद्द, परिश्रम आणि श्रद्धा यांच्या बळावर  माणूस स्वतःचे भाग्य घडवू शकतो. ती जगप्रसिद्ध व्यक्ती होऊ शकते.

मेघांशी बोलणारा कवी असे म्हटले जात.

कालिदासांना निसर्गाचा जादूगार म्हणूनही संबोधले जाते  त्यांच्या लेखणीत पर्वत बोलतात, नद्या गातात, वेली हसतात, फुले डोलतात आणि ढग प्रेमाचा संदेश घेऊन उडतात.

त्यांच्या अमर ''मेघदूत'' याकाव्याची सुरुवातच आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवसाच्या वर्णनाने होते

आषाढस्य प्रथमदिवसे
मेघमाश्लिष्टसानुं वप्रक्रीडापरिणत प्रेक्षणीयं ददर्श




याचा साधा अर्थ असा

''आषाढ महिन्याच्या पहिल्याच दिवशी एका विरही यक्षाने पर्वतशिखराला बिलगलेल्या, खेळकर हत्तीप्रमाणे भासणाऱ्या मेघाला पाहिले.''

याच मेघाला तो आपल्या प्रिय पत्नीपर्यंत प्रेमाचा संदेश पोहोचविण्याची विनंती करतो. म्हणूनच मेघदूत हे केवळ काव्य नाही, तर प्रेम, विरह, आशा आणि निसर्ग यांचा दिव्य संगम आहे.

कालिदास मेघाला सांगतात -
संतप्तानां त्वमसि शरणं ...

म्हणजे, ''हे मेघा, दुःखाने व्याकूळ झालेल्यांचा तू आधार आहेस.''

एका ठिकाणाहून तू दुसऱ्या ठिकाणी जातो तू बरसणारा संदेश वाहक आहेस.

या एका ओळीत त्यांनी ढगाला केवळ पावसाचे प्रतीक न ठेवता करुणा, आशा आणि जीवनदायी शक्तीचे रूप दिले आहे.

कालिदासांची अमर साहित्यसंपदा

कालिदासांनी संस्कृत साहित्यात अनेक अमर ग्रंथ निर्माण केले.

अभिज्ञानशाकुंतलम  - राजा दुष्यंत आणि शकुंतला यांच्या प्रेमकथेवर आधारित जगप्रसिद्ध नाटक.

मेघदूतम्  - विरही यक्षाने मेघाला संदेशवाहक बनविलेली अद्वितीय काव्य कृती

अभिज्ञानशाकुंतलम् - राजा दुष्यंत आणि शकुंतला यांच्या प्रेमकथेवर आधारित जगप्रसिद्ध नाटक

रघुवंशम् - रघुवंशातील राजांची गौरवगाथा आणि भगवान श्रीरामांच्या कुलाचा इतिहास.

कुमारसंभवम् - भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या दिव्य विवाहाचे आणि भगवान कार्तिकेयांच्या जन्माचे महाकाव्य.

ऋतुसंहार - भारतातील सहा ऋतूंचे रंग, गंध, सौंदर्य आणि जीवन यांचे अप्रतिम चित्रण.

मालविकाग्निमित्रम् आणि विक्रमोर्वशीयम् ही त्यांचीप्रसिद्ध नाटके आजही रसिकांना मोहित करतात.

संशोधन आणि साहित्यवैशिष्ट्ये

कालिदास हे विज्ञानातील संशोधक नव्हते; परंतु ते मानवी मनाचे, निसर्गाचे आणि भारतीय संस्कृतीचे विलक्षण संशोधक होते. त्यांच्या लेखनातभूगोल, खगोल, वनस्पती, ऋतू, नद्या, पर्वत आणि मानवी भावविश्व यांचे सूक्ष्म निरीक्षण दिसते.

त्यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये -

१अप्रतिम उपमा आणि रूपके.

२निसर्ग व मानवी भावना यांचा सुंदर मिलाफ.

३संस्कृत भाषेची मधुर, संगीतासारखी लय.

४भारतीय संस्कृती आणि मूल्यांचे दर्शन.

५जिवंत पात्रचित्रण आणि कल्पनाशक्तीचा अद्भुत आविष्कार.

म्हणूनच संस्कृतमध्ये एक प्रसिद्ध म्हण आहे

''उपमा कालिदासस्य''

म्हणजेच उपमा द्यायची झाली, तर ती कालिदासां सारखीच असावी.

जगभरातील कीर्ती

कालिदासांच्या साहित्याचे इंग्रजीसह अनेक जागतिक भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. त्यांच्या अभिज्ञानशाकुंतल या नाटकाने जगातील अनेक विद्वान आणि साहित्यिकांना प्रभावित केले. भारतीय साहित्याचा सुगंध जगभर पोहोचविण्यात त्यांचे योगदान अनमोल आहे

महाकवी कालिदासांचे जीवन आपल्याला खूप काही शिकवते.

ज्ञान मिळविण्यासाठी वयाची अट नसते.

अपमानही यशाची प्रेरणा ठरू शकतो.

निसर्ग हा सर्वांत मोठा गुरु आहे.

सातत्य, परिश्रम आणि श्रद्धा यांच्यामुळे अशक्य वाटणारी स्वप्नेही साकार होतात.भाषा आणि साहित्य हे राष्ट्राचे सांस्कृतिक वैभव जपणारे अमूल्य धन आहे.

आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी आकाशात दाटणारे मेघ आजही जणू महाकवी कालिदासांची आठवण करून देतात. प्रत्येक पावसाच्या सरीत प्रत्येक हिरव्यागार डोंगरात, प्रत्येक मोराच्या नृत्यात आणि प्रत्येक सुगंधी वाऱ्यात त्यांच्या काव्याचा स्वर दडलेला आहे.

महाकवी कालिदास हे केवळ संस्कृतचे कवी नव्हते; ते निसर्गाचे उपासक, मानवी भावनांचे कुशल चित्रकार आणि भारतीय संस्कृतीचे अमर गायक होते. त्यांनी शब्दांना आत्मा दिला, मेघांना संदेशवाहक बनविले आणि निसर्गाला कवितेची भाषा दिली.

जोपर्यंत आषाढातील पहिला मेघ हिमालयाच्या शिखरांना स्पर्श करीत राहील, जोपर्यंत पावसाच्या पहिल्या सरी पृथ्वीला हिरवा शालू नेसवतील, तोपर्यंत महाकवी कालिदासांचे काव्य आणि त्यांचे अमर नाव भारतीय संस्कृतीच्या आकाशात अजरामर तेजाने झळकत राहील.

# प्रदुषन निर्मूलन निसर्ग शिकवण

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

दिनांक २२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिवस आपण दरवर्षी कागदोपत्री साजरा करतो पण तो प्रत्यक्षात कर्म रूपाने साजरा करण्याची गरज आहे एक दिवसाच्या समारंभा पुरता तो मर्यादीत नसावा. शहरातील आणि परिसरातील वाढते औद्योगीकरण आणि हवामानात निसर्ग लहरी प्रमाणे होणारा बदल नैसर्गिक संसाधनाची बाब आपल्या मनावर  प्रचंड तान देत आहे. ही बाब आपल्या मनात सुद्धा गुंजन करीत असेलच त्यासाठी पाणी, माती, वायु यांचे शाश्वत रक्षणासाठी नियोजन करणे आणि त्याची आपल्या पासून सुरुवात करणे काळाची खरी गरजआहे. वास्तविक पाहता निसर्ग हा ईश्वराचे च प्रतिनिधिक प्रतिकच आहे म्हणून त्याचे संवर्धन केलेच पाहिजे रक्षण केले पाहिजे.

प्लाष्टीक, ॲल्युमिनीयम् यांचा वापर बंद केला पाहिजे किंवा गरजेपुरता त्याचा वापर करणेचे योगदान आपल्या परीने नक्कीच देवू न पर्यावरणाचे रक्षण नक्कीच करू शकतो हे आपल्या अंतर्मनात ठरविले पाहिजे केवळ शासन काही करील म्हणून आपण काही करण्याची गरज नाही ह्या मताला विसर्जित केले पाहिजे.

पर्यावरणाचे रक्षक म्हणून प्रथमतः ज्येष्ठ



व्यक्तीनी आपल्या ज्ञात मार्गातून पुढाकार घेतला तर आपण हक्काने त्या बद्दल आपल्या पुढच्या पिढीला बजावू शकतो.





आपल्या नित्य कर्मातून ही पर्यावरण रक्षणाची किमया राबवून दाखविली पाहिजे. त्यासाठी तरुण मुला मुली नी पण पथ नाट्यातून जनजागृती केली पाहिजे स्त्रीयानी किमान घरातील ओला - सुका कचरा वेगळा करून घंटागाडी वाल्या कडे प्रेमाने सोपवला पाहिजे शिवाय कचरा जाळूण टाकण्या पासून आपण दूर राहिले पाहिजे आणि समाजाला ह्या कृत्याचे दुष्परिणाम समजून सांगण्याचे काम केले पाहिजे . आणखी एक महत्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की देह जाळून प्रदूशन निर्माण करण्यापेक्षा देहदानाचे संकल्प करून पूर्णत्वास नेले पाहिजे. मग अपेक्षीत आनंद आपल्या पदरी नांदू शकतो.

# माझी आई...!

**ज्योतिर्मय साहित्य**

खरं तर आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात आईचे स्थान, आईची जागा कोणीही घेऊ शकत नाही. कारण, आई ही फक्त आई असते. आईची तुलना ईतर कोणासोबतही करता येतच नाही. कारण, ईश्वराने आईला जसं बनवलं आहे जी कलाकुसर ईश्वराकडून, ईश्वराच्या हातून घडली आहे ती आईच्या समर्पणाला समर्पित आहे.



आई म्हणजे ''आत्म्याचा ईश्वर''. म्हणजे सर्वश्रेष्ठ, सर्वोच्च, सर्वगुणसंपन्न आणि बरेच काही. आई आपला पहिला गुरु असते. आई आपल्याला नऊ महिने आधीच ओळखते. आपलं आणि आईचं नातं हे नऊ महिने आधीचं असतं. आई आहे तर सगळं आहे अन्यथा सगळे काही शून्य. आईमुळे आपण जग पाहतो, सगळ्या गोष्टी शिकतो तरीही आईला कोणत्याच कामाचे पैसे दिले जात नाहीत. कारण, इथे आईतलं आईचं समर्पण आपल्या लेकरांसाठी समर्पित झालेलं असतं.




''आई म्हणजे'' --

आई म्हणजे उत्कृष्ट महिला
आई म्हणजे वात्सल्य छाया
आई म्हणजे घराचं घरपण
आई म्हणजे अंगणाची शोभा
आई म्हणजे दुधावरची साय
आई म्हणजे शितल छाया
आई म्हणजे लेकरांचं जगणं
आई म्हणजे घराचे सर्वस्व
आई म्हणजे समर्पण
आई म्हणजे अर्पण
आई म्हणजे सुंदर सकाळ
आई म्हणजे जगण्याचं महत्त्व आ
ई म्हणजे यशाचे रहस्य.

आईमुळे आपण आहोत. आई मुळे घर आहे. आईमुळे घराचं घरपण आहे. म्हणून प्रत्येक दिवस हा आईचा दिवस आहे. मला सुंदर जग दाखवणाऱ्या, मला घडवण्यात मोठा वाटा असणाऱ्या, मला प्रत्येक गोष्ट समजावून सांगणाऱ्या, मला यशापर्यंत पोहोचवणाऱ्या माझ्या आईला साष्टांग नमस्कार...

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559